नवीन पदे निर्माण करणे व रिकाम्या जागा भरणे यावर असलेली बंदी

नाईक पदासाठी सूट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक: व्यक-१०८८/सीआर-१८३/सेवा-८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ६ एप्रिल १९८८.

पहा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीएमएस १७७७/सीआर-५७७/एसईआर-७, दिनांक १५ नोव्हेंबर १९७८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी २५८६/सीआर-४/आरईएस-५, दिनांक १४ मे १९८६.

शासन निर्णय :- वर [२] येथे उल्लेखिलेल्या दिनांक १४ मे १९८६ च्या शासन निर्णयामध्ये असे आदेश दिलेले आहेत की, त्या आदेशात निर्देशित केलेल्या पध्दतीनुसार मंत्रिमंडळाची पूर्व संमती घेतल्याशिवाय कोणतीही पदे निर्माण करु नयेत. शासनाच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, वरील आदेशामुळे चतुर्थ वर्गातील शिपायांना नाईक पदावर नेमणूक मिळण्यापासून वंचित व्हावे लागले. म्हणून शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक १४ मे १९८६ मधील तरतुदी शिथिल करुन शासन आता असे आदेश देत आहे की —

[एक] शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: सीएमएस १७७७/सीआर-५७७/एसईआर-७, दिनांक १५ नोव्हेंबर १९७८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ज्या कार्यालयात शिपायांची दहा अगर जास्त पदे असतील, तेथे शिपायांतील प्रत्येक १० पदामागे एका पदाची श्रेणीवाढ करुन नाईकाचे एक पद उपलब्ध करुन देण्यात यावे. मात्र अशा श्रेणीवाढी नंतरही संबंधित कार्यालयातील चतुर्थ श्रेणीतील एकंदर पदे तेवढीच राहिली पाहिजेत याची दक्षता घेण्यात यावी. याकरीता जादा पदे मंजूर केली जाणार नाहीत. अशा श्रेणीवाढीसाठी मंत्रिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता असणार नाही.

[दोन] याप्रमाणे दिनांक ३१ मार्च १९८८ रोजी असलेल्या शिपायांच्या पदांवर आधारित शिपायांच्या पदांची श्रेणीवाढ करुन नाईकांची पदे निर्माण करण्याचे अधिकार ह्या निर्णयाद्वारे मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात येत आहेत, आणि

[तीन] दिनांक १ एप्रिल १९८८ नंतर मंजूर होणाऱ्या शिपायांच्या पदांवर आधारीत शिपायांच्या पदांची श्रेणीवाढ करुन देय होणारी नाईकांची पदे निर्माण करण्यास मात्र वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता असेल.

२. सर्व विभाग प्रमुखांनी आपापल्या विभागातील परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि वरील आदेशानुसार तातडीने कार्यवाही करावी.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
6 MAY 1988
शाखा - EST

३. याप्रमाणे जिल्हा परिषदांच्या बाबतीत ग्राम विकास विभागाने आदेश काढावेत. वरील परिच्छेद १ मधील [दोन] प्रमाणे नाईकांची पदे निर्माण करण्यास ग्राम विकास विभागाची व वरील परिच्छेद १ मधील [तीन] प्रमाणे पदे निर्माण करण्यास वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

४. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नरेंद्र कर्णिक,
शासनाचे उप सचिव.

प्रति :-

महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई [१२५ प्रती],
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर [१२५ प्रती],
महालेखापाल-१ [लेखापरीक्षा] महाराष्ट्र, मुंबई [५ प्रती],
महालेखापाल-२ [लेखापरीक्षा] महाराष्ट्र, नागपूर [५ प्रती]
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई [५ प्रती],
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई [१५ प्रती],
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई [५ प्रती],
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी [प्रत्येकी १० प्रती],
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
x प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
x प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
म मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त [प्रत्येकी ५ प्रती],
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी [प्रत्येकी २५ प्रती],
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी [प्रत्येकी १० प्रती],
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे [१० प्रती],
तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई [५ प्रती],
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई [५ प्रती],
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक [प्रत्येकी ३ प्रती]
सर्व विभागीय तंत्रशिक्षण उप संचालक [प्रत्येकी ३ प्रती],
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई [१२ प्रती],
शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई [२५ प्रती],
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
[illegible]

Ban on creation and filling of vacant posts -

Relaxation in respect of posts of Naiks.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Resolution No. CFS-1088/CR-183/SER-8,
Mantralaya, Bombay-400 032, Dated 6th April 1988.

**READ**:- (1) Government Resolution, Finance Department, No. CFS-1477/CR-577/SER-7, dated 15th November 1978.

(2) Government Resolution, Finance Department, No. BGT-2586/CR-4/RES-5, dated 14th May 1986.

**RESOLUTION**:- In Government Resolution dated the 14th May, 1986 referred to at (2) above, it was directed that no posts should be created unless approval of the Cabinet has first been obtained in the manner prescribed therein. It has been brought to the notice of Government that these orders deprive the class IV employees in the category of peons from getting appointments to the posts of Naiks. In relaxation of Government Resolution, Finance Department, dated the 14th May, 1986, Government is now pleased to direct that —

i) as laid down in Government Resolution, Finance Department, No. CFS-1477/CR-577/SER-7, dated 15th November, 1978, where the number of posts of peons in an office is ten or more, one post of Naik should be made available for every ten posts of peons by upgrading one post of peon into that of a Naik. It should be clearly understood that the total number of posts in the concerned office in Class IV should, however, remain the same even after such upgradation. No additional posts will be sanctioned for this purpose. Approval of the Cabinet for such upgradation would not be necessary;

ii) The Administrative Departments of Mantralaya are hereby delegated powers to create such posts of Naiks (by upgradation) which are due to an office on the basis of the strength of peons as on 31st March, 1988;

and

iii) creation of additional posts of Naiks becoming due on the basis of posts of peons which will be sanctioned after 1st April 1988 should however be done with the approval of the Finance Department.

2. All Heads of Departments are requested to take a review of the position obtaining in their Departments and take immediate action in terms of the above directions.

3. Similar orders in respect of Zilla Parishads should be issued by the Rural Development Department. Approval of the Rural Development Department to create posts of Naiks in Zilla Parishads in terms of para 1 (ii) above and of the Finance Department in terms of Para 1 (iii) above would be necessary.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N.W. KARNIK,
Deputy Secretary to Government.